# जिओस्पेशियल टेक्नोलॉजीविषयी प्रशिक्षण

केसीई सोसायटीच्या जलश्री संस्थेतर्फे आगा खान रिसर्च फाउंडेशन, खंडवा, मध्यप्रदेश येथील १० अभियंत्यांना जिओस्पेशियल टेक्नोलॉजीविषयी प्रशिक्षण देण्यात आले.

डॉ.चेतन महाजन व समीर कुरेशी यांनी प्रशिक्षण दिले. त्यात रिमोट सेन्सिंग, जीआयएस, जीपीएस या तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली. तंत्रज्ञानाचा वापर पाणलोट क्षेत्रात कसा करता येईल हे सांगण्यात आले. अजिंठा लेणी पर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी क्षेत्र भेटी घेण्यात आल्या.




प्रशिक्षणाच्या समारोपावेळी केसीईचे प्रशासकीय संचालक डॉ.डी.जी.हुंडीवाले, प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी, जलश्रीच्या संचालिका डॉ.स्वाती संवत्सर, कार्यक्रम व्यवस्थापक मिलिंद पंडित उपस्थित होते. यावेळी जीआयएस आधारित एक कोर्स सुरु करण्याचा मानस असल्याचे सांगितले.